# 'प्रसिध्दी पत्रक'

# पोलीस अधीक्षक कार्यालय, उस्मानाबाद

बुधवार, दि.१८/०९/२०१९

## "मौजे नालगांव: गावठी बनावटीचे पिस्टल व काडतुस बाळगणाऱ्यावर कारवाई."

**पोलीस ठाणे, परंडा:** राधिका नागनाथ गायकवाड रा. नालगांव, ता.परंडा यांनी त्यांचा भाऊ पंकज विलास करळे रा. नालगांव याच्या विरुध्द दि. ०८.०८.२०१९ रोजी पोलीस ठाणे, परंडा येथे अर्ज दिला कि, त्यांच्या नावे असलेली ५ एकर जमीन खरेदी करण्यासाठी त्यांचा भाऊ हा त्यांच्या डोक्याला पिस्टल लाउन "जमीन खरेदीसाठी चल." असे म्हणुन दमदाटी केली होती. यावरुन राधिका गायकवाड यांनी स्वत:च्या घरी आत्महत्या करणार असलेबाबतचा अर्ज पोलीस ठाणे, परंडा येथे दिला होता. दि. १७.०९.२०१९ रोजी १२.३० वा. सु. मौजे नालगांव येथे सदर तक्रारी अर्जाची यातील नमुद आरोपीकडे चौकशी केली असता त्याच्या ताब्यात गावठी बनावटीचे स्टिल बॉडीचे पिस्टल व दोन जिवंत काडतुस ९ एम.एम. ३५,०००/- रु. किंमतीचे विनापास परवाना स्वत:जवळ बाळगलेला पोलीस ठाणे, परंडा यांच्या पथकास आढळुन आला आहे. यावरुन त्याच्याविरुध्द पोलीस ठाणे, परंडा येथे भारतीय हत्यार कायदा कलम ३, २५ सह मु.पो.का. कलम ३७ (१)(३) प्रमाणे गुन्हा दि. १७.०९.२०१९ रोजी नोंदवण्यात आला आहे.

## "सार्वजनिक शांतता भंग करणाऱ्याविरुध्द कारवाई."

**पोलीस ठाणे, तुळजापूर:** १) जयवंत बलभिम साळुंके २) किशोर बापुराव साळुंके ३) तानाजी बापुराव साळुंके ४) शंकर बापुराव साळुंके सर्व रा. तुळजापूर यांनी दि. १७.०९.२०१९ रोजी १९.०० वा. सु. जुने बसस्थानक, तुळजापूर येथे आपापसात लाथाबुक्क्यांनी, दगडाने मारहान केली. तसेच आरडा-ओरड करुन सार्वजनिक शांतता भंग करीत असतांना पोलीस ठाणे, तुळजापूर यांच्या पथकास आढळुन आले. यावरुन त्यांच्याविरुध्द पोलीस ठाणे, तुळजापूर येथे भा.दं.वि. कलम १६० प्रमाणे गुन्हा दि. १७.०९.२०१९ रोजी नोंदवण्यात आला आहे.

## "छोटा हत्तीच्या धडकेत एक पुरुष मयत."

**पोलीस ठाणे, लोहारा:** असिफ बाबुसाब बागवान रा. तुरोरी, ता.उमरगा (ह.मु. जळकोट) याने छोटा हत्ती क्र. एम.एच. २५ एजे ०६०४ हा दि. २७.०८.२०१९ रोजी ०६.३० वा. सु. आष्टा मोड ते जेवळी रोडवर निष्काळजीपणे भरधाव वेगात चालवुन रोडचे कडेला थांबलेला प्रभाकर गुणवंत बोडके रा. वडगाववाडी, ता.लोहारा यांचा मुलगा विनोद प्रभाकर बोडके (मयत) यांना धडक दिली. त्यामुळे ते गंभीर जखमी होउन मयत झाले व त्यांच्या मोटारसायकलचे नुकसान करण्यास कारणीभुत झाला. अशा मजकुराच्या प्रभाकर बोडके यांच्या फिर्यादीवरुन वरील अरोपीविरुध्द पोलीस ठाणे, लोहारा येथे भा.दं.वि. कलम २७९, ३०४ (अ) सह मो.वा.का. कलम १८४ प्रमाणे गुन्हा दि. १७.०९.२०१९ रोजी नोंदवण्यात आला आहे.

## "मौजे नांदुर्गा: महिलेस माहेर-सासरच्यांकडुन ठार मारण्याचा प्रयत्न."

**पोलीस ठाणे, बेंबळी:** अंजना उर्फ पुनम संतोष डावकरे वय २१ वर्षे रा. नांदुर्गा, ता.जि.उस्मानाबाद यांना १) रमेश कोळगे (चुलता) २) प्रताप कोळगे (चुलत भाऊ) ३) सुनिल कोळगे (चुलत भाऊ) ४) कांताबाई

कोळगे (चुलती) ५) रिता कोळगे (भावजय) ६) राधा कोळगे (भावजय) ७) संतोष पांडुरंग डावकरे (पती) ८) शंकर डावकरे (दिर) ९) अनुसया डावकरे (सासु) १०) पांडुरंग डावकरे (सासरा) ११) मोहन डावकरे १२) जीवन डावकरे १३) बाळासाहेब डावकरे सर्व रा. नांदुर्गा, ता.जि.उस्मानाबाद १४) शांता भोईटे (चुलत बहीण) १५) निवृत्ती भोईटे (मेहुणा) १६) अमर भोईटे (बहीणीचा मुलगा) तिघे रा. रुईभर, ता.जि.उस्मानाबाद यांनी संगणमत करुन दि. १६.०९.२०१९ रोजी २१.०० ते २१.३० वा. सु. मौजे नांदुर्गा येथे अंजना उर्फ पुनम डावकरे व त्यांचे आई-वडील, भाऊ दिनेश कोळगे यांना शिवीगाळ, मारहान केली. तसेच संतोष डावकरे याने अंजना उर्फ पुनम डावकरे यांना धरले व अनुसया डावकरे हिने त्यांच्या अंगावर रॉकेल ओतुन पेटवुन दिले. त्यात अंजना उर्फ पुनम डावकरे ह्या भाजुन गंभीर जखमी झाल्या. दिनेश कोळगे याने सदर आग विझवण्याचा प्रयत्न केला असता त्यात त्याचा हात भाजला आहे. अशा मजकुराच्या अंजना उर्फ पुनम डावकरे यांनी वैद्यकीय उपचारादरम्यान दिलेल्या (एम.एल.सी.) जबाबावरुन वरील आरोपींविरुध्द पोलीस ठाणे, बेंबळी येथे भा.दं.वि. कलम ३०७, १४३, १४७, १४९, ३२३, ५०४ प्रमाणे गुन्हा दि. १७.०९.२०१९ रोजी नोंदवण्यात आला आहे.

## "महिलेचा विनयभंग."

**<u>पोलीस ठाणे, उमरगा:</u>** दि. १५.०९.२०१९ रोजी १६.०० वा. सु. एक महिला (नाव-गाव गोपनीय) स्वत:च्या शेतात एकटी जनावरे चारत असतांना ज्ञानोबा विनायक माने रा. माडज, ता.उमरगा याने सदर महिलेसोबत झोंबाझोंबी केली. तसेच तिस लज्जा वाटेल असे कृत्य करुन तिचा विनयभंग केला. अशा मजकुराच्या पिडीत महिलेच्या फिर्यादीवरुन त्यांच्याविरुध्द पोलीस ठाणे, उमरगा येथे भा.दं.वि. कलम ३५४ प्रमाणे गुन्हा दि. १७.०९.२०१९ रोजी नोंदवण्यात आला आहे.

## "तुळजापूर: रोख रक्कम व मोबाईल फोनची चोरी."

**<u>पोलीस ठाणे, तुळजापूर:</u>** श्रीकांत ज्ञानदेव भोसले रा. देवसिंगा (तुळ), ता.तुळजापूर हे दि. १७.०९.२०१९ रोजी १६.०० वा. सु. आठवडी बाजार, तुळजापूर येथे बाजार करत होते. त्यावेळी सागर मच्छिंद्र विटकर व अन्य एक पुरुष दोघे रा. बीड यांनी श्रीकांत भोसले यांना धक्का देउन नकळत त्यांच्या खिशातील मोबाईल फोन चोरला. सदर बाब श्रीकांत भोसले यांच्या लक्षात आल्याने त्यांनी त्यास पकडेले असता त्याच्या जवळ वेगवेगळ्या कंपनीचे एकुण सात मोबाईल फोन एकत्रीत किं.अं. २४, ५००/- रु. व रोख रक्कम ४,०००/- रु. असा एकुण २८,५००/- रु. चा मिळुन आला. अशा मजकुराच्या त्यांच्या फिर्यादीवरुन वरील आरोपींविरुध्द पोलीस ठाणे, तुळजापूर येथे भा.दं.वि. कलम ३७९, ३४ प्रमाणे गुन्हा दि. १७.०९.२०१९ रोजी दाखल केला आहे.

## "उस्मानाबाद: स्टॅम्प व महत्त्वाच्या कागदपत्रांची चोरी."

**<u>पोलीस ठाणे, आनंदनगर:</u>** दि. ०५.०९.२०१९ रोजी दुपारी १२.३० ते १३.०० वा. दरम्यान विजयकुमार दगडोपंत गरड, रा. खेड, ता.जि.उस्मानाबाद हे निवीदा भरण्यासाठी आवश्यक कागदपत्रांचे ओमकार झेरॉक्स सेंटर, उस्मानाबाद येथे झेरॉक्स काढत होते. त्यावेळी कोणीतरी अज्ञात चोरट्याने त्यांची मुळ कागदपत्रे, तीन स्टॅम्प व डिजीटल स्वाक्षरीत फी असे एकुण ६,५००/- रु. किंमतीचे साहित्य चोरुन नेले आहेत. अशा

मजकुराच्या त्यांच्या फिर्यादीवरुन अज्ञात चोरट्याविरुध्द पोलीस ठाणे, आनंदनगर येथे भा.दं.वि. कलम ३७९ प्रमाणे गुन्हा दि. १८.०९.२०१९ रोजी नोंदवण्यात आला आहे.

**"मुरुम: बेकायदेशीर जमाव जमवुन मारहान."**

**पोलीस ठाणे, मुरुम:** भिमराव शरणाप्पा गुंडगुळे रा. मुरुम, ता.उमरगा व त्यांच्या पत्नी या दोघांत झालेल्या भांडणाच्या कारणावरुन १) सिध्दाराम आणाप्पा हत्तरगे २) शरण आणाप्पा हत्तरगे ३) गुरुनाथ मुलगे ४) शिवपुत्र बिराजदार ५) शिवपुत्र बिराजदार यांचा मुलगा व इतर चार व्यक्ती सर्व रा. मटकी, ता.आळंद, जि.गुलबर्गा, राज्य कर्नाटक यांनी आपापसात संगणमत करुन बेकायदेशीर जमाव जमवुन दि. ०९.०९.२०१९ रोजी ०९.३० ते १०.३० वा. सु. मुरुम येथे भिमराव गुंडगुळे यांना त्यांच्या घरासमोर लाथाबुक्क्यांनी मारहान केली. तसेच त्यांना मटकी येथे नेउन शिवपुत्र बिराजदार यांच्या घरासमोर शिवीगाळ, लाथाबुक्क्यांनी मारहान करुन जिवे ठार मारण्याची धमकी दिली. अशा मजकुराच्या भिमराव गुंडगुळे यांच्या फिर्यादीवरुन वरील आरोपींविरुध्द पोलीस ठाणे, मुरुम येथे भा.दं.वि. कलम ३२३, ५०४, ५०६, १४३, १४७, १४९ अन्वये गुन्हा दि. १७.०९.२०१९ रोजी दाखल केला आहे.

**"मौजे पेठसांगवी: जुन्या भांडणाच्या कारणावरुन मारहान."**

**पोलीस ठाणे, लोहारा:** दि. १६.०९.२०१९ रोजी २२.४५ वा. सु. मौजे पेठसांगवी येथे १) सुकेशन शिवहार बिराजदार २) बिभीषन शिवहार बिराजदार दोघे रा. बेटजवळगा, ता.उमरगा यांनी संगणमत करुन जुन्या भांडणाच्या कारणावरुन शयनाज बाबु मुजावर रा. पेठसांगवी, ता.उमरगा यांच्या घरात घुसून त्यांना सुकेशन बिराजदार याने ढकलून देवुन त्यांच्या पतीस धक्काबुक्की केली. तसेच बिभीषन बिराजदार याने शिवीगाळ करुन जिवे ठार मारण्याची धमकी दिली. अशा मजकुराच्या शयनाज मुजावर यांच्या फिर्यादीवरुन वरील आरोपींविरुध्द पोलीस ठाणे, लोहारा येथे भा.दं.वि. कलम ४५२, ३२३, ५०४, ५०६, ३४ प्रमाणे गुन्हा दि. १७.०९.२०१९ रोजी दाखल केला आहे.

**"मौजे आलेश्वर: किरकोळ कारणावरुन मारहान."**

**पोलीस ठाणे, आंबी:** दि. १७.०९.२०१९ रोजी १८.०० वा. सु. दिपक भालचंद्र ठोसर व दशरथ परमेश्वर ठोसर रा. आलेश्वर, ता.परंडा हे दोघे नात्याने चुलत भाऊ आहेत. त्यांच्याच गावातील पांडुरंग किसन कांबळे याने दशरथ ठोसर यांना शेतात मारहान केली होती. त्यावरुन दिपक ठोसर यांनी पांडुरंग कांबळे यास " तु माझ्या चुलत भावास का मारहान कली?" असे विचारले आसता पांडुरंग कांबळे याने " तुझ्या आईने व ग्रामसेवक यांनी मला घरकुलाचे पैसे मिळु दिले नाहीत." असे म्हणुन त्यांना शिवीगाळ करुन लोखंडी सळई दिपक ठोसर यांच्या डोक्यात मारुन जखमी केले. तसेच जिवे ठार मारण्याची धमकी दिली. अशा मजकुराच्या दिपक ठोसर यांच्या फिर्यादीवरुन वरील आरोपीविरुध्द पोलीस ठाणे, आंबी येथे भा.दं.वि. कलम ३२३, ३२४, ५०४, ५०६ प्रमाणे गुन्हा दि. १८.०९.२०१९ रोजी नोंदवण्यात आला आहे.

**"उस्मानाबाद: किरकोळ कारणावरुन मारहान."**

**पोलीस ठाणे, आनंदनगर:** १) राम प्रताप ढेकणे २) मंगल प्रसाद ढेकणे ३) लक्ष्मी ढेकणे सर्व रा. शिवनेरी नगर, उस्मानाबाद यांच्या घराचे बांधकाम चालू असल्याने बांधकामाचे साहित्य त्यांच्या शेजारी राहणाऱ्या महानंदा राजकुमार निर्मले यांच्या जागेत टाकले. महानंदा निर्मले यांनी "आमचे जागेत बांधकामाचे साहित्य

टाकु नका.” असे म्हणताच वरील सर्वांनी संगणमत करुन त्यांना शिवीगाळ, लाथाबुक्क्यांनी मारहान केली. तसेच मंगल ढेकणे यांनी महानंदा निर्मले यांच्या डोक्यात हातोडा मारुन जखमी केले. अशा मजकुराच्या महानंदा निर्मले यांनी वैद्यकीय उपचारादरम्यान दिलेल्या (एम.एल.सी.) जबाबावरुन वरील आरोपींविरुध्द पोलीस ठाणे, आनंदनगर येथे भा.दं.वि. कलम ३२४, ३२३, ५०४, ३४ प्रमाणे गुन्हा दि. १८.०९.२०१९ रोजी नोंदवण्यात आला आहे.

**“मौजे पाटोदा: किरकोळ कारणावरुन मारहान.”**

**<u>पोलीस ठाणे, बेंबळी:</u>** १) शिवाजी लक्ष्मण माळी २) विजयमाला शिवाजी माळी ३) हणुमंत शिवाजी माळी हे सर्व धन्यकुमार लक्ष्मण माळी यांचे नात्याने भाऊ, भावजय व पुतण्या असे असुन सर्व रा. पाटोदा, ता.जि.उस्मानाबाद येथील आहेत. दि. ०८.०९.२०१९ रोजी ०७.०० वा. सु. धन्यकुमार माळी हे शेतात जाण्यासाठी त्यांच्या घरासमोर रोडवर थांबले होते. त्यावेळी शिवाजी माळी यांनी “ तु आमची गावातील लोकांमध्ये बदनामी का करतोस.” असे म्हणुन त्यांना शिवाजी माळी व विजयमाला माळी यांनी शिवीगाळ केली. तसेच हणुमंत याने धन्यकुमार यांच्या डोक्यात लाकुड मारुन जखमी केले. अशा मजकुराच्या धन्यकुमार माळी यांनी वैद्यकीय उपचारादरम्यान दिलेला (एम.एल.सी.) जबाब जेल रोड पोलीस ठाणे शहर, जि.सोलापूर येथुन प्राप्त झाल्याने पोलीस ठाणे, बेंबळी येथे भा.दं.वि. कलम ३२६, ५०४, ३४ प्रमाणे गुन्हा दि. १८.०९.२०१९ रोजी नोंदवण्यात आला आहे.

**“अवैध मद्य विक्री विरुध्द कारवाई”**

**<u>पोलीस ठाणे, कळंब:</u>** दि. १७.०९.२०१९ रोजी ११.५५ वा.सु. संगिता पिंटु काळे रा. मोहा, ता.कळंब ह्या दारुचा अवैध विक्री व्यवसाय करण्याच्या उद्देशाने मौजे मोहा येथे १० लिटर गावठी दारु कॅनसह किं.अं. ५५०/-रु. चा माल स्वत:च्या कब्जात बाळगला असतांना पोलीस ठाणे, कळंब यांच्या पथकास आढळुन आल्या. यावरुन त्यांच्याविरुध्द पोलीस ठाणे, कळंब येथे म.दा.का. कलम ६५ (ई) प्रमाणे गुन्हा दि. १७.०९.२०१९ रोजी दाखल केला आहे.

**“मोटार वाहन कायदा-नियमांचे उल्लंघन: २३ कारवाया.”**

**<u>उस्मानाबाद जिल्हा:</u>** दि. १७/०९/२०१९ रोजी उस्मानाबाद जिल्हयातील १८ पोलीस ठाणी व जिल्हा वाहतुक शाखा उस्मानाबाद यांनी वाहतुकीचे नियम मोडणाऱ्यांविरुध्द मोटार वाहन कायद्याच्या विविध कलम-नियमांनुसार २३ कारवाया केल्या असुन त्यातुन ४,००० ₹ **‘तडजोड शुल्क’** वसुल करण्यात आले आहे.

---

**स्वाक्षरीत**

म.पोलीस उपनिरीक्षक

जनसंपर्क विभाग,उस्मानाबाद